**वन संरक्षणाबाबत दोन महिन्यांतून किमान एकदा बैठक न घेतल्यास कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर नियमानुसार कारवाई करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्र. टिआरएस-०९/ २०२५/प्र.क्र.२६५/फ-६**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय मुंबई-३२.
दिनांक- ०३ ऑक्टोबर २०२५

**वाचा:-**

१. शासन निर्णय क्र.सावвि-२०१९/प्र.क्र.५६/फ-११ दि. ०४.०६.२०२५
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१८/दक्षता/पाव.अ.२४/ विसप्र/प्र.क्र.१८/२४-२४/२७८ दि.१३.०६.२०२५

**प्रस्तावना:-**

सन १९८८ च्या राष्ट्रीय वनधोरण व सन २००८ च्या महाराष्ट्र वनधोरणानुसार राज्यातील एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी ३३ टक्के क्षेत्र वनाच्छादीत असणे गरजेचे आहे. महाराष्ट्र राज्यात एकूण भौगोलिक क्षेत्र ३,०७,७१२ चौ. कि.मी. असून यातील वनांचे क्षेत्र ६१,९९१,८९ चौ. कि.मी. (अस्थाई) आहे. त्याची भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी २०.१५ टक्के आहे. चोरटी वृक्षतोड व वाहतूक यावर नियंत्रण ठेवणे करिता वनविभागातील प्रत्येक क्षेत्रिय संवर्गाकरिता संरक्षणाच्या बाबी हाताळणे कामी वनसंरक्षणाचे मापदंड निश्चित करण्यात आले असून,त्यानुसार कार्यवाही करण्यात येत असल्याची काळजी घेतली जाते. राज्याचे वनक्षेत्र आणि वृक्ष आवरण सध्याच्या २० टक्केवरुन ३३ टक्केवर नेण्यासाठी वृक्ष लागवड आणि संगोपन कार्यक्रम सातत्यपूर्ण रितीने राबविणे गरजेचे आहे. पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्यासाठी तसेच अवैध नियोजन, अंमजबजावणी आणि सनियंत्रणाबाबत तालुका स्तरावर मा. आमदार महोदयांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती गठीत करण्याबाबत यापूर्वीच शासन निर्णय क्र. सावвि-२०१९/प्र.क्र.५६/फ-११ दि.०४.०६.२०२५ निर्गमित करण्यात आलेला आहे.

पर्यावरण संरक्षण तसेच पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्यासाठी मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक (प्रा.) यांनी दोन महिन्यातून किमान एकदा बैठक घेण्यात यावी, जेणकरुन उपरोक्त मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करता येईल, ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रमाचे नियोजन, अंमलबजावणी आणि सनियंत्रणाबाबत तालुका स्तरावर दोन महिन्यातून एकदा बैठका घेण्याबाबत शासन निर्णय दि. ०४.०६.२०२५ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर बैठका नियमित आयोजित करण्यात येत आहे किंवा कसे यावर मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक (प्रा.) हे संनियंत्रण ठेवतील. जर अशा प्रकारच्या बैठका घेण्यास जाणून बुजून विलंब होत असल्यास संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल. त्यामुळे राज्यातील वेगवेगळया भागामध्ये होणारी अवैध वृक्षतोड,अवैध लाकूड वाहतूक, वनवणवा,तस्करी यावर सनियंत्रण होऊन सदर कार्यक्रम अधिक सक्षमतेने पूर्ण होईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५१००३१३००४८१८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

UDAY CHANDRAKANT DHAGE

Digitally signed by UDAY CHANDRAKANT DHAGE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DE
2.5.4.20=d50c7e8b1126d276bbe49105f9d24fff67dc9032e4afab15f5d0d94a0e
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=097E903F6E5707A0A9A3CDAEBE40C9235E8FDA1EE2C8C4EA7
ED, cn=UDAY CHANDRAKANT DHAGE
Date: 2025.10.03 13:03:00 +05'30'

**( उदय ढगे)**
**विशेष कार्य अधिकारी, महसूल व वन विभाग**

**प्रति,**

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर.

३) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

४) व्यवस्थापकीय संचालक, वन विकास महामंडळ, नागपूर.

५) प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)

६) अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर

७) सर्व विभागीय आयुक्त (महसूल)

८) जिल्हाधिकारी (सर्व)

९) पोलिस अधिक्षक (सर्व)

१०) प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व)

११) उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी (सर्व)
(त्यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णयाच्या छायांकित प्रती यांच्या कार्यक्षेत्रातील संयुक्त वनव्यवस्थापन समित्या / ग्रामपंचायती यांना उपलब्ध करुन देण्यात याव्यात)

१२) उपविभागीय अधिकारी (महसूल) सर्व

१३) जिल्हा विकास अधिकारी, (सर्व), जिल्हा कृषी अधिकारी/मृदसंधारण अधिकारी (सर्व)

१४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

१५) सर्व आयुक्त महानगरपालिका

१६) सर्व मुख्य वनसंरक्षक/उपवनसंरक्षक (प्रादेशिक)
वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण वृत्त, कोकण,ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर.

१७) सर्व प्रशासकीय विभागांचे प्रादेशिक प्रमुख व विभाग प्रमुख.

१८) सर्व विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग (सर्व जिल्हे)

१९) महालेखापाल, (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर

२०) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

२१) अधिदान लेखा अधिकारी, मुंबई.

२२) सर्व महामंडळे/मंडळे, शासकीय उपक्रम.

२३) निवासी लेखा परिक्षा अधिकारी,मुंबई

२४) वित्त विभाग, व्यय-९, अर्थसंकल्प-०६ मंत्रालय, मुंबई-३२

२५) कार्यासन अधिकारी, फ/२, फ/७ महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

२६) कार्यासन अधिकारी, ब-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

२७) सर्व सचिव/उप सचिव/अवर सचिव (सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

२८) सर्व कार्यासन अधिकारी, महसूल व वनविभाग

२९) निवडनस्ती, फ-६ कार्यासन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२